

MARATHI

# लेडी टारझन!

## जमुना भूमिका घेते

जर आपली जंगले जगली तरच माणसाची प्रगती होईल. !


लावण्या कार्तिक

रेखाचित्रं : राजीव आइप

अनुवाद : रमा हर्डीकर-सखदेव



एकलव्य

# लेडी टारझन! जमुना भूमिका घेते
Lady Tarzan! Jamuna Bhumika Ghete

कथा : लावण्या कार्तिक
रेखाचित्रं : राजीव आइप
अनुवाद : रमा हर्डीकर-सखदेव

मराठी अनुवाद : एकलव्य फाउंडेशन, सितम्बर २०२३
लेखन : लावण्या कार्तिक
हे पुस्तक Attribution-Non-Commercial-NoDerivatives 4.0 International (CC BY-NC-ND 4.0) लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण https:creativecommons.org/licecses/by-nc-nd/4.0/ वर उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा कोणताही बदल न करता उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.

रेखाचित्रं © राजीव आइप, सितम्बर २०२३

मूळ पुस्तक आणि त्याचा अनुवाद यांच्याकरता टाटा ट्रस्टच्या पराग इनिशिएटिव्हचे साहाय्य लाभले आहे.

पहिली आवृत्ती : सितम्बर२०२३ (2000 प्रती)
कागद : १०० जीएसएम मॅट आर्ट आणि मुखपृष्ठ 220 एफबी बोर्ड
ISBN : 978-81-963643-6-6
मूल्य : ₹ 55.00

हे पुस्तक इंग्रजीमध्ये *Lady Tarzan! Jamuna takes a Stand* आणि हिंदीमध्येही *लेडी टार्ज़न! जमुना* नावाने, इकतारा ट्रस्ट, भोपाळ यांची मुद्रा असलेल्या जुगनू प्रकाशनने प्रकाशित केले आहे

एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेडी, भोपाळ 462 026 (मध्य प्रदेश)
Phone: +91 755 297 7770-71-72
Website: www.eklavya.in; Email: books@eklavya.in

मुद्रक : आर के सिक्युप्रिंट प्रा लि, भोपाल; फोन: +91 755 268 7589

# लेडी टारझन!

## जमुना भूमिका घेते

लावण्या कार्तिक

रेखाचित्रं: राजीव आइप

अनुवाद : रमा हर्डीकर-सखदेव



एकलव्य



मुटूरखामच्या घनदाट जंगलांमध्ये रात्री उशिरा...

सावल्या घेरून येतात, खालच्या आवाजातील कुजबुज ऐकू येते, एक कुऱ्हाड उचलली जाते.

आणि मग ...सटाक!

“धावा! लेडी टारझन आली!” असा ओरडा ऐकू येतो.


आणि एक आवाज येतो
खबरदार माझ्या भावांना हात लावाल तर!



गोष्ट सुरु होते जमुना नावाच्या एका छोट्याशा मुलीपासून.

“झाडं म्हणजे जीवन आहे,” ओदिसातील रायरांगापूरमधील आपल्या घराबाहेर एक झाड लावताना तिचे वडील म्हणाले. “ ती म्हणजे आपलं कुटुंबच आहे. तुझ्या भावाबहिणीसारखे .”

“म्हणजे काय बाबा?” जमुनाला समजलं नाही.

“म्हणजे मी आणि आई जेव्हा कामात असतो, तेव्हा तुझे बहीण-भाऊ तुझी काळजी घेतात की नाही, तसंच. तुला खाऊ, गोळ्या-टॉफी कोण देतं? आणि लागल्यावर मलमपट्टी कोण करतं?”

“हं...”

झाडंही तसंच करतात. ती आपल्याला अन्न, औषधं आणि लाकूडफाटा देतात. ती आपल्याला सावली देतात आणि कितीतरी प्राण्या-पक्ष्यांना निवारा देतात. ती पुरापासून आपलं रक्षण करतात आणि आपण श्वास घेतो ती हवासुद्धा स्वच्छ करतात.

“पण माझे भाऊ मला त्रासपण देतात! बहिणी माझी खेळणी लपवून ठेवतात. माझे केस ओढतात!”

बाबा हसले, “ त्यांच्याविना जगण्याचा विचार तरी करू शकतेस का तू?”

“नाही!” जमुनाने वळून जंगलाकडे पाहिलं. तिच्या बहीण-भावांकडे. सगळं जीवन तर त्यांच्यामुळेच सुरू होतं.





जेव्हा जमुनाच्या लग्नाची बोलणी सुरू झाली तेव्हा तिला काळजी वाटू लागली. मी इतक्या दूर मुटूरखामला जाईन. मी तिथे एकटी पडेन! सगळेच लोक नवे, अनोळखी असतील!

“पण मुटूरखामला किती सुंदर जंगल आहे. आणि जंगल असतं तिथे कोण असतं ते तर तुला माहीतच आहे!” बाबा हसून म्हणाले.

“माझे भाऊ...” आपल्या नव्या घरी फिरता फिरता जमुना हसली. “भाऊ आणि...”

ठाक! ठाक! कडाड्! धडाम्!

एक देखणा सालवृक्ष कापला जाऊन खाली कोसळला.

मग आणखी एक... आणखी एक!




जिथे पाहू तिथे जंगलतोड सुरू असलेली तिला दिसली.

लाकडाचे तस्कर झाडं कापत होते.

घरं बांधण्यासाठी तळी कोरडी केली जात होती.

शेतीसाठी आगी लावून जमीन साफ केली जात होती.

कातडी, हाडं आणि मांसासाठी प्राण्या-पक्ष्यांच्या शिकारी केल्या जात होत्या.





“आपण त्यांना थांबवायला हवं,” दुःखी स्वरात जमुना म्हणाली.

“नाही, आपण असं काहीही करायला नको. ते तस्कर खूप शक्तिशाली आहेत,” तिचा नवरा म्हणाला.

“तसं करणं वेडेपणाचं ठरेल!” शेजारी-पाजारी म्हणाले. “कारण शिकाऱ्यांकडे हत्यारं आहेत.”



“आपण त्यांना थांबवू शकत नाही. आपण मूठभर लोक काय करणार?” मुटूरखाममधले गावकरी म्हणाले.





अख्ख्या मुटूरखाममध्ये कोणीच तिच्या पाठीशी उभं राहिलं नव्हतं.

तिला धीर देणारं, हिंमत देणारं, झाडं वाचवायला पुढे येणारं कोणीच नव्हतं.
झाडं तर तिचं कुटुंब होती. आता तिलाच तिच्या भावांसाठी एक धीट,
खंबीर बहीण बनावं लागणार होतं.

जमुनाने जंगलात गस्त घालायला सुरुवात केली.

“थांबा! खबरदार ते झाड कापलंत तर!” तिनेच झाडांवर, जंगलावर लक्ष ठेवण्याची, पहारा देण्याची जबाबदारी घेतली.

दिवसरात्र ती जंगलाच्या कानाकोपऱ्यात फिरायची. एकटीच, न घाबरता.

ती तस्करांना थेट जाऊन भिडायची. धीटपणे शिकाऱ्यांचा सामना करायची. वणवा पेटला तर लगेच खबर द्यायची.

पण अशी एकटी बाई काय करू शकते?





जर हिंमत दाखवली तर एकटी बाई खूप काही करू शकते.


जमुना गावाच्या चारही बाजूंना झाडं लावायची.

गावातल्या लोकांनीही या मोहिमेत सहभागी होणं कसं गरजेचं आहे, याबद्दल ती त्यांच्याशी बोलायची.



आणि एक दिवस लोकांनाही ते समजलं.





मुटूरखाममधले लोक एकत्र आले. मोहिमेत सहभागी झालेल्यांची संख्या वाढत गेली. काठ्या, धनुष्य-बाण घेऊन लोक जंगलात गस्त घालू लागले. त्यांनी जंगलतोड करणाऱ्यांचा आणि शिकाऱ्यांचा खंबीरपणे सामना केला.

तस्करांनी जमुनाला धमक्या दिल्या. तिच्या घरात येऊन तोडफोड केली. तिला जीवे मारायचाही प्रयत्न झाला. पण जमुना खचून गेली नाही.

“ती किती शूर आहे. तिला कोणाचीही भीती वाटत नाही.” मुटूरखामचे लोक प्रेमाने म्हणतात, “ती तर लेडी टारझन आहे!”



मुटूरखाममधल्या बातम्या आजूबाजूच्या गावांमध्ये पोचल्या आणि तिथून संपूर्ण झारखंडमध्ये पसरल्या. जिथे जिथे जमुनाची गोष्ट पोचली, तिथे तिथे लोकांनी झाडांना आपलं भाऊ-बहीण मानलं. आणि लोक झाडांना वाचवायला एकत्र उभे ठाकले.

आज झारखंडमध्ये दहा हजारांहून जास्त लोक झाडांना आपली भावंडं मानतात. त्यांनी आजवर ५० हेक्टरहूनही मोठ्या प्रदेशात पसरलेल्या जंगलांना वाचवलं आहे.

मुटूरखाममधलं जंगल पुन्हा एकदा बहरायला लागलं आहे. गावात जन्मलेल्या प्रत्येक मुलीच्या स्वागतासाठी अठरा सालवृक्ष लावले जातात. आणि सुनांचं स्वागत दहा सालवृक्ष लावून केलं जातं.

जमुना तुडूच्या या हिमतीला आणि जिद्दीला सलाम! या कामासाठी तिला पद्मश्रीसोबतच इतरही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे.

कारण आपलं कुटुंब मानलेल्या झाडांचं संरक्षण करीत ती आजही मुटूरखामच्या जंगलात गस्त घालते.





तुम्ही तिला लेडी टारझन या नावाने ओळखता.

आम्ही तिला आमची बहीण म्हणतो.

**लावण्या कार्तिक** यांनी मुलांसाठी सुमारे तीस पुस्तकं लिहिली आहेत. यात निन्जा नानी, महान भारतीय अशा काही चित्रमय कादंबऱ्या आणि मालिका आहेत. त्यांच्या पुस्तकांना अट्टा गलट्टा बीएलएफ अवॉर्ड, पब्लिशिंग नेक्स्ट अवॉर्ड आणि पीकाबुक चॉइस अवॉर्ड यांसारखे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्या मुंबईतल्या बाल्कनीत जंगल उगवून हिरव्यागार जगाचं आपलं स्वप्न पूर्ण करायचा प्रयत्न करतात.

lavanyaskarthik@gmail.com

**राजीव आइप** यांच्या ॲनिमेटेड फिल्म्समधली पात्रं कधी पुस्तकात दिसतात तर कधी पुस्तकातली एखादी चिमणी गोगलगायीला पाठीवर बसवून एखाद्या सिनेमात चक्कर मारून येते. हे चालू राहावं म्हणून मुलं बरेचदा पुस्तकं मिटतच नाहीत. राजीव आइप यांना बिग लिटिल बुक अवॉर्डने सन्मानित करण्यात आलं आहे. त्यांना कॉफीवर कॉफी रिचवत आपल्या स्केचबुकमध्ये डूडल्स काढत राहायला आवडतं. त्यांच्या मते अधेमध्ये उगाचच शून्यात नजर लावून बसून राहण्यातली मजा काही औरच असते.

rajiveipe@gmail.com

जमुना लहानपणापासूनच झाडांना आपलं कुटुंब मानत आली होती. जसे तिचे भाऊ-बहिणी, तशीच झाडं. मग आपल्या भावा-बहिणींना संकटात पाहून एखादी बहीण काय करेल? तर, जमुना लेडी टारझन बनली! ही गोष्ट आहे, पद्मश्री जमुना तुडू उर्फ लेडी टारझन यांची. आणि जंगलं वाचवण्यासाठीच्या त्यांच्या निडर लढाईची.

parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS

Big Little Book Award
Winning Illustrator

जुगनू
इकतारा ट्रस्ट की प्रकाशन छाप

मूल्य : ₹ 55.00

9 788196 364366

एकलव्य